घरचा स्वाद, घरची शुध्दता...
शुद्ध घ्या... स्वस्थ रहा
नवल
शुध्द तूप
म्हशीचे व गायीचे साजूक तूप
फोन नं.(०२५६२) २३८६६१ navalgheedhule@gmail.com सर्वत्र उपलब्ध

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६७ ■ अंक क्र.१७७ ■ मंगळवार २ एप्रिल २०२४ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
• Dosas • Sandwiches • Pav Bhaji • Pulao • Frankie
• Pizza • Fries • Chopsuey / Noodles / Fried Rice
• Momos • Soup • Punjabi / Chinese / Continental
• Starters • Sizzler • Tandoor Starters • Chaap
• Main Course • Thali • Fresh Juices • Falooda
Milkshakes / Dessert JAIN FOOD AVAILABLE
FREE HOME DELIVERY
B'Live Restaurant
Also available on zomato SWIGGY
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
93078 68768, 02562 236040

## पुढील दहा वर्षे भारताची आत्मनिर्भरता वाढविणार
## आरबीआयच्या वर्धापनदिनी पंतप्रधानांची घोषणा

**नवी दिल्ली, दि.१– पुढचे शंभर दिवस मी थोडा निवडणुकीत व्यस्त असेन. तुम्ही सर्वजण अर्थात आरबीआय आणि बँकिंग क्षेत्रांशी संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि संस्था या काळात तयारी करून ठेवा. भारताची आत्मनिर्भरता पुढच्या दहा वर्षांसाठी वाढवायची आहे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.**

भारतीय रिझर्व्ह बँकेचा सोमवारी ९० वा वर्धापन दिन होता. यानिमित्त मुंबईत रिझर्व्ह बँकेच्या मुख्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासह महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा विकसित भारताचा नारा दिला. मोदी म्हणाले, विकसनशील भारताचा विकसित भारत होण्याच्या प्रवासात रिझर्व्ह बँकेची महत्त्वाची भूमिका असेल. रिझर्व्ह बँकेने गेल्या दहा वर्षांमध्ये भारताची बँकिंग व्यवस्था आणि अर्थव्यवस्था रुळावर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. परंतु, गेल्या दहा वर्षांमध्ये आपण केलेली कामे केवळ एक ट्रेलर आहे. चित्रपट येणे अद्याप बाकी आहे.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, २०१४ मध्ये रिझर्व्ह बँकेच्या ८० व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात मी सहभागी झालो होतो. तेव्हाची परिस्थिती (पान ४ वर)

## सीएम केजरीवाल पंधरा एप्रिलपर्यंत न्या.कोठडीत

नवी दिल्ली, दि.१– मद्य धोरण प्रकरणात २१ मार्चपासून तुरुंगात असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याशी संबंधित दोन प्रकरणांची सोमवारी (१ एप्रिल) २ वेगवेगळ्या न्यायालयांत सुनावणी झाली. पहिला खटला तुरुंगातून केजरीवाल यांच्या सरकारी आदेशाविरुद्ध होता. तुरुंगातून सरकारी आदेश देण्यावर बंदी घालण्याची मागणी करणारी जनहित याचिका सुरजित सिंह यादव यांनी दाखल केली होती. यावर सुनावणी करताना प्रभारी मुख्य न्यायमूर्ती मनमोहन आणि न्यायमूर्ती मनमीत प्रीतम सिंग अरोरा यांच्या खंडपीठाने याचिका फेटाळून लावली. दुसरा खटला केजरीवाल यांच्या कोठडीचा आहे. त्यांची ईडी कोठडी १ एप्रिल रोजी (पान ४ वर)

## एलसीबीचे पो.निरीक्षक दत्तात्रय शिंदेंवर कारवाई
## अँटीकरप्शनने दीड लाख घेतांना दोघांना पकडले

**धुळे, दि.१– एक एप्रिल असल्याने मिळालेली माहिती खरी की एप्रिल फूल? असा विचार करायला लावणारी घटना अँटी करप्शनच्या धाडीतून चर्चेत आली. विशेष म्हणजे स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा (एल.सी.बी.) च्याच कर्मचाऱ्यांना दोंडाईचा येथील एक तडीपारीचे प्रकरण तयार न करण्यासाठी बोलीवर दीड लाखाची लाच घेतल्यानंतर दोघा कर्मचाऱ्यांना दोंडाईचा येथे सायंकाळी साडेपाच वाजता पकडले आहे. या घटनेनंतर एलसीबीचे पी.आय. दत्तात्रय शिंदे यांना देखील रात्री उशिरापर्यंत लाचलुचपत विभागाने आपल्या ताब्यात ठेवले आहे. या घटनेत त्यांच्यासह तिघांवर गुन्हा दाखल होणार असल्याचे सांगितले जाते. विशेष म्हणजे एलसीबीचे दोन कर्मचारी हे सकाळपासून दोंडाईचा येथे लाच घेण्यासाठी थांबून होते.**

याबाबतची अधिक माहिती अशी की, दोंडाईचा येथील माजी नगरसेवक नरेंद्र गुलाब सोनवणे यांच्यावर अनेक राजकीय गुन्हे आहेत. त्यामुळे आम्ही हद्दपारीचा प्रस्ताव दाखल करु शकतो, असे सांगत ते थांबवण्यासाठी दोन लाख रुपये द्यावेत अशी मागणी एलसीबीच्या दोघा पोलीस कॉन्स्टेबलतर्फे करण्यात आली होती. यासंदर्भात त्यांनी एलसीबी पीआय दत्तात्रय शिंदे यांना भेटण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे फिर्यादी सोमवार दि.१ एप्रिल रोजी भेटला. यानंतर दीड लाख रुपये देण्याचे ठरले. तडजोडीअंती ही रक्कम दीड लाखावर दोघा बाजूंनी निश्चित झाली होती. ती लाच घेण्यासाठी आज दिवसभर एलसीबीचे अशोक साहेबराव पाटील व नितीन मोहने हे दोंडाईचा येथे आलेले होते. यावेळी त्यांनी दोंडाईचा पोलीस स्टेशनला देखील भेट दिली होती. कर्मचाऱ्यांनी त्यांना ताक देखील पाजले. ते काय कामासाठी आले हे कुणालाच माहिती नव्हते. तक्रारदाराने त्यांना बस स्टॅन्डसमोरील जैन मंदिराच्या मोकळ्या जागेत सायंकाळी ५.३० वाजता बोलावले होते व त्याठिकाणी पैसे



घेतांना त्यांना रंगेहाथ पकडले. यानंतर त्यांचे मोबाईल ताब्यात घेतले. त्यांना पकडताच धुळ्याला लाचलुचपत खात्याचे पो. उपअधीक्षक अभिषेक पाटील यांना दोघांना पकडल्याची माहिती पथकाने दिली. यानंतर स्वत: अभिषेक पाटील यांनी पोलिस अधीक्षक कार्यालयात असणाऱ्या एलसीबीच्या ऑफिसमध्ये जावून एलसीबी पीआय दत्तात्रय शिंदे यांना तुम्ही आमच्याबरोबर चौकशीसाठी चला, असे सांगून संतोषी माता येथील एसीबी कार्यालयात नेले. या घटनेची माहिती पोलीस दलाबरोबरच लोकांमध्ये वाऱ्यासारखी पसरली. हद्दपारीचे प्रकरण तयार करण्याचे अधिकार हे एलसीबी प्रमुखाकडे असतात. त्यामुळे यात दत्तात्रय शिंदे यांचा किती सहभाग आहे, हे चौकशीअंतीच स्पष्ट होईल. विविध सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार एलसीबीच्या दोघा कर्मचाऱ्यांनी दत्तात्रय शिंदे यांना फोन लावला होता व साहेब काम झाले, असे सांगितले. यामध्ये दत्तात्रय शिंदे यांना देखील अटक करण्यात आली आहे. यासंदर्भात रात्री उशिरा किंवा पहाटे दोंडाईचा पोलिसात गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे. याबाबत एक प्रेसनोट देखील निघाली असून त्यामध्ये तिघांना या प्रकरणात ताब्यात घेतले असल्याचे लाचलुचपत खात्याने सांगितले आहे. तसेच तिघांचे फोटो देखील प्रेसनोमध्ये उपलब्ध झाले आहेत. या गुन्ह्यामध्ये लाचलुचपत खात्याचे पोलीस उपअधीक्षक अभिषेक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.रुपाली खांडवी, हेमंत बेंडाळे तसेच पथकातील राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, रामदास बारेला, प्रविण मोरे, प्रशांत बागुल, प्रविण पाटील, सुधीर मोरे, जगदीश बडगुजर यांनी ही कामगिरी बजावली आहे.

## पुण्यातील सराईत गुन्हेगारांना वरला येथे अटक
## बारा पिस्तूल, दहा काडतुसांसह मुद्देमाल जप्त

**शिरपूर दि.१ (का.प्र.)– मध्यप्रदेशातील उमरठी येथून शस्त्रे घेऊन जाणाऱ्या पुण्याच्या दोन कुख्यात गुन्हेगारांना वरला पोलिसांनी अटक केली. ही कारवाई ३१ मार्चला करण्यात आली. १२ पिस्तूल आणि १० काडतुसांसह सुमारे १७ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.**



उमरठी येथून शस्त्रसाठा खरेदी करून दोन संशयित पुण्याकडे निघाल्याची माहिती वरला पोलिसांना मिळाली होती. त्यांनी वरल्याकडून सांगवीकडे येणाऱ्या सापळा रचला. संशयित इनोव्हा कार (एमएच २५, एल ०९९०) ला अडवून दोघांना ताब्यात घेऊन पोलिसांनी इनोव्हाची झडती घेतली. या कारवाईत पाच देशी बनावटीची पिस्तुले, १२ बोअरचे सात देशी कट्टे, पिस्तूलाची आठ तर कट्ट्यांची दोन जिवंत काडतुसे असा शस्त्रसाठा आढळला. त्यांचे मोबाईल आणि इनोव्हा कारदेखील पोलिसांनी जप्त केली. या कारवाईत १७ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला. अधीक्षक गेहलोद, अपर अधीक्षक अनिल पाटीदार, डीवायएसपी (पान ४ वर)

## उष्णतेची लाट २० दिवस राहणार

नवी दिल्ली– भारतीय हवामानशास्त्र विभागाने यंदा अधिक उष्मा येण्याची शक्यता वर्तवली आहे. एप्रिल ते जून या तीन महिन्यांपर्यंत तापमान जास्त राहील. या वेळी २० दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून ती साधारणत: ८ दिवस राहणार आहे. आयएमडीच्या म्हणण्यानुसार, पुढील तीन महिन्यांत देशातील सहा राज्यांमध्ये मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, ओडिशा आणि आंध्र प्रदेशमध्ये उष्णतेचा अधिक प्रभाव जाणवेल. पुढील आठवड्यात तापमान २ ते ५ अंशांनी वाढू शकते. एप्रिल–जून दरम्यान भारताच्या बहुतांश भागात कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. मैदानी भागांमध्ये उष्णतेची लाट सामान्यपेक्षा जास्त असेल.

## पहिल्या टप्प्यातील ५ जागांसाठी ८५ उमेदवार रिंगणात

नागपू, दि.१– लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील ५ जागांसाठी उमेदवार निश्चित झाले असून लढतींचे चित्र देखील अगदी स्पष्ट झाले आहे. विदर्भातील ५ जागांसाठी एकूण ८५ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. यात नागपूर लोकसभेत सर्वाधिक २६ उमेदवार रिंगणात आहेत. त्या खालोखाल चंद्रपूरमध्ये १५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. विदर्भातील बहुतांश जागांवर काँग्रेस विरुद्ध भाजप अशी थेट लढत होणार आहे. त्याचबरोबर वंचित बहुजन आघाडी आणि बहुजन समाज पार्टीने दिलेल्या उमेदवारांमुळे निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे आहेत. पहिल्या टप्प्यातील एकूण पाच लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिल २०२४ रोजी मतदान होणार आहे. यामध्ये रामटेक, नागपूर, भंडारा–गोंदिया, गडचिरोली– चिमूर आणि चंद्रपूरचा समावेश आहे. एकूण ५ मतदारसंघात ८५ उमेदवार रिंगणात आहेत.



## आर्वीत दुकानाला भीषण आग
## हजारो रुपयांचा मुद्देमाल खाक

**धुळे, दि.१– तालुक्यातील आर्वी गावातील राधेश्याम मोटर्सला सोमवारी सकाळी अचानक आग लागली. या आगीत दुकानातील २० ते २५ हजार रूपयांचा मुद्देमाल जळुन खाक झाल्याने मोठे नुकसान झाले आहे. दुकान मालकासह परिसरातील नागरिकांनी आगीवर पाणी टाकून आग आटोक्यात आणली.**

याबाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील आर्वी गावात मयूर पाटील यांचे राधेश्याम मोटर्स या दुकानाला सोमवारी सकाळी ८ ते ८.३० वाजेच्या सुमारास अचानक आग लागली. दुकानातून मोठ्या प्रमाणावर धूर बाहेर आल्याने परिसरातील व्यापाऱ्यांसह नागरिकांनी दुकानमालकाला फोन करून सांगितले. दुकान मालक मयूर पाटील हे दाखल झाल्यावर त्यांचेसह इतरांनी जवळच असलेल्या टँकरच्या पाण्याने आग विझवली. दुकानात आग कशामुळे लागली याचे कारण समजले नसले तरी शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या आगीत दुकानातील २० ते २५ हजार रूपयांचा मुद्देमाल जळुन खाक झाल्याचे दुकान मालक मयूर पाटील यांनी सांगितले.

## डंपरची दुचाकीला धडक; एक गंभीर

धुळे, दि.१– धुळे चाळीसगाव रस्त्याने तरवाडे बारीच्या पुढे येत असतांना भरधाव वेगाने जाणाऱ्या डंपरने दुचाकीला मागून धडक दिल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. पितांबर दगा करडे यांनी दि.३१ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, धुळे तालुक्यातील आर्वी गावातील पौरोहित्य करणारे कोदंडपाणी ऊर्फ राहुल राजेंद्र कुलकर्णी (वय ३२) हे मोटर सायकल क्र.एमएच १८/बीयु–२४१३ घेवून तरवाडे बारी येथून येत असतांना मागून भरधाव वेगाने येणारे डंपर क्र. जीजे १२/एयु–७७३३ ने मागुन जोरदार धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील राहुल कुलकर्णी हे खाली कोसळून गंभीर जखमी झाले.

## मा.न्यायमुर्तींच्या आश्वासनानंतर कर्मचाऱ्यांचे आंदोलन स्थगित

**धुळे, दि.१– न्यायालयीन कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी महासंघ आणि मुख्य न्यायमुर्ती यांच्यात बैठक झाली. चर्चे नंतर न्यायमुर्तींनी दिलेल्या आश्वासनानंतर दि.१ एप्रिल रोजी काळ्या फिती लावनू काम करण्याचे आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती धुळे जिल्हा न्यायालयीन कर्मचारी गट क, गट ड व सर्व न्यायालयीन संघटना यांचेकडून देण्यात आली.**

या आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा न्यायालय गट क संघटनेचे अध्यक्ष सुनिल जिरे, उपाध्यक्ष किशोर मिठसागर, सचिव मनोज अहिरराव, कार्याध्यक्ष प्रविण बागुल, कोषाध्यक्ष नितीन बर्डे, स्टेनो संघटनेचे प्रशांत कुलकर्णी, बेलिफ संघटनेचे अध्यक्ष सुर्यकांत डोमाडे, वर्ग ड, संघटनेचे प्रतिनिधी गिरीष उपासनी, सचिन ताडगे, विवेक पंचभाई, विशाल बडगुजर, किशोर बागुल, योगेश पुराणिक, पंकज पगारे, दीपक दीक्षित, सचिन सोनवणे, समीर शेख, साजन चव्हाण, जयेश पाटील, सारंग पाटकर, इम्रान खान, रमाकांत कढे, प्रशांत पाटील, पुष्पक ठाणगे, नकुल पाटील, कुणाल कासार, निलेश सोनवणे व निलीमा भालेराव, कविता चव्हाण, जयश्री गुरव यांनी परिश्रम घेतले.

## चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेराच केला लंपास

धुळे, दि.१– शहरातील मालेगाव रोड परिसरातील खाऊगल्ली नावाच्या दुकानाजवळ लावलेला सीसीटीव्ही कॅमेरा व युनिट अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. व्यापारी महिलेने दि.३१ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, मालेगाव रोडवरील फायनल प्लॉट नं.९६ येथील खाऊ गल्ली नावाच्या दुकाना बाहेर ओनिडा कंपनीचे वीस हजार रूपये किंमतीचे युनिट तसेच नऊ हजार रूपये किंमतीचे सीसीटीव्ही कॅमेरा, सर्व्हर ड्राईव्ह माऊस मॉनिटर व हार्डडिस्क असा एकूण एकोणतीस हजार रूपये किंमतीचे साहित्य लावलेले होते. अज्ञात व्यक्तीने एकोणतीस हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## माती उचलण्याच्या कारणावरून हाणामारी; चौघांवर गुन्हा दाखल

**धुळे, दि.१– धुळे तालुक्यातील कुसुंबा येथे शेतात शेजारी असलेल्या पडीत जागेवर माती उचलण्याचे काम बंद झाले. याप्रकरणी तहसिलदारांची चौकशी सुरू असतांना आम्ही काम बंद केले. असे म्हणत चार जणांनी एकास शिवीगाळ करत जबर मारहाण केली. मोबाईल व सोन्याची चेन हिसकावून नेल्याची घटना घडली आहे.**

प्रदीप मधुकर बाविस्कर यांनी दि.३१ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, प्रदीप बाविस्कर यांच्या शेताच्या शेजारी पडीत जागेवरील माती उचलण्याचे काम बंद का झाले याबाबत तहसिलदार यांची चौकशी सुरू असतांना अनिल महादू चौधरी(वय ५२), लोकेश अनिल चौधरी, गणेश अनिल चौधरी (वय २२) व मोतीलाल कौतिक चौधरी सर्व रा.कुसुंबा ताजि.धुळे व इतर तीन ते चार जणांनी शिवीगाळ करत प्रदीप बाविस्कर यांना मारहाण केली. जीवे ठार मारण्याची धमकी दिली. यावेळी लोकेश चौधरी याने मोबाईल हिसकावला तसेच गळ्याची सोन्याची चेन असा एकुण सतरा हजारांचा मुद्देमाल बळजबरीने हिसकावून नेला. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला असून अनिल चौधरी, लोकेश चौधरी व गणेश चौधरी या तिघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## आर्वीतील विवाह समारंभात दागिने लांबविणाऱ्या दोघा भामट्यांना सहा तासात मुद्देमालासह अटक

**धुळे, दि.१– तालुक्यातील आर्वी येथील विवाह समारंभातून तब्बल दोन लाख अकरा हजारांचे सोन्या–चांदीचे दागिने व रोकड लंपास करणाऱ्या दोघा भामट्यांना अवघ्या सहा तासात बेड्या ठोकल्याची कामगिरी तालुका पोलिसांनी बजावली आहे. दोघांकडून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**



याबाबत अधिक माहिती अशी की, आर्वी ता.जि.धुळे येथील पुरोहित कोदडपाणी उर्फ राहूल राजेंद्र कुलकर्णी यांचे भाऊ गणेश राजेंद्र कुलकर्णी यांचा दि.३० मार्च रोजी धुळे आर्वी गावातील कन्यादान मंगल कार्यालयात विवाह होता. सदर विवाहात कुलकर्णी यांच्या आईचे ताब्यात असलेली काळ्या रंगाची पर्स ही अज्ञात व्यक्तीने चोरून नेली होती. याबाबत धुळे तालुका पो.स्टे. ला गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात संशयिताने सुमारे २ लाख ११ हजार ९०० रुपयांचे दागिने लंपास केले होते. सदरचा गुन्हा घडल्याची माहिती तालुका पो.निरी.प्रमोद पाटील यांना मिळताच (पान ४ वर)

## प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती चौधरींच्या दणक्यानंतर पूर्ववत

**शिंदखेडा, दि.१ (प्रतिनिधी) – येथील माळीवाड्यातील नादुरुस्त झालेल्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या दुरुस्तीचे पुन्हा निकृष्टपणे होत आहे. याबाबत नगरसेवक सुनील चौधरी यांच्याकडे नागरिकांनी तक्रार केल्यानंतर नगरपंचायतीचे माजी विरोधीपक्ष नेते चौधरी यांच्या दणक्यानंतर आता सदरचे काम व्यवस्थित सुरू झाले आहे.**




सन २०११ मध्ये दहा लाख रुपये खर्चून हे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र बांधण्यात आले. इमारत बांधून पूर्ण झाली होती. मात्र तिचे उद्घाटन व्हायच्या आधीच वर्षभरातच इमारतीचे दरवाजे–खिडक्या चोरट्यांनी काढून नेल्या. भिंतीची पडझड झाली. इमारत काटेरी झुडपांनी वेढली गेली होती. ती घाणीच्या साम्राज्यात अडकली गेली. जन्माला येण्याआधीच या इमारतीचा अंत झाल्यागत स्थिती होती. या परिसरातील शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी यांच्यासाठी हे उपकेंद्र वरदान ठरणार होते. दरम्यानच्या काळात उपकेंद्र सुरू करावे यासाठी अनेकदा मागणी झाली, मात्र उपयोग झाला नाही. यानंतर शहर काँग्रेसने हा प्रश्न हाती घेतला. जिल्हा काँग्रेसचे (पान ४ वर)

## शिरपूर तालुक्यात दोघांची आत्महत्या

**धुळे, दि.१– शिरपूर तालुक्यातील लाकडया हनुमान व महादेव दोंदवाडा येथील एक तरूण व एक तरूणी अशा दोघांनी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.**

नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, शिरपूर तालुक्यातील लाकड्या हनुमान येथील रहिवासी पवनसिंग बाबुलाल पावरा(वय २५) या तरूणाने राहत्या घरी काही तरी विष प्राशन केले. अत्यवस्थ स्थितीत उपजिल्हा रूग्णालय चोपडा येथे उपचारासाठी दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले.

दुसऱ्या घटनेत शिरपूर तालुक्यातील महादेव दोंदवाडा येथिल एकवीस वर्षीय तरूणी आरती चंद्रसिंग वळवी हिने काही तरी विषारी औषध प्राशन केले. अत्यवस्थ (पान ४ वर)

## लग्न समारंभाला होतोय उशीर; भर उन्हात नेत्यांची दमछाक

**तऱ्हाडी, दि.१ (प्रतिनिधी) – सध्या राजकीय नेते, पुढारी यांची उपस्थिती लग्नात असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण बनत चालले असल्यामुळे अगदी लग्न पत्रिकांमध्ये देखील नेते मंडळींच्या नावांची रेलचेल असल्याने नेत्यांची भर उन्हात दमछाक होत आहेत.**

लग्न समारंभामध्ये सर्वच पक्षांचे राजकीय नेते, पुढारी यांची नावे टाकण्यावर भर असतो. तालुक्यातील आजी–माजी पदाधिकारी, राजकीय नेते, कार्यकर्ते यांच्या नावांचा भरणा अधिक असल्याचे चित्र दिसून येत आहे. अशा पद्धतीने राजकीय नेते, पुढारी लग्न सोहळ्यांमध्ये आले तरच विवाह समारंभास भव्यदिव्य स्वरूपाच प्राप्त होत असल्याचा अविर्भाव वधू–वर दोन्ही बाजूच्या मंडळींचा असतो. मात्र, राजकीय नेत्यांची उपस्थिती असलीच पाहिजे व राजकीय नेते आणि पुढाऱ्यांच्या उपस्थितीतच लग्नसोहळा पार पडावा अशा अट्टहासापायी लग्नांना उशीर होत असल्याचेही चित्र आहे.

लग्न सोहळ्यामध्ये केले जाणारे सत्कार समारंभ म्हणजे आपल्या राजकीय व समारंभ म्हणजे आपल्या राजकीय व सामाजिक प्रतिष्ठेचे ओंगळवाणे प्रदर्शन तर नाही ना, याचाही विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. रूढी, परंपरेनुसार मुला–मुलीच्या पसंतीनंतर मुहूर्त काढला जातो आणि त्या मुहूर्तावरच लग्न लागावे असे ठरविले जाते; पण पुढाऱ्यांच्या उपस्थितीच्या अट्टहासापायी खरंच किती लग्ने या ठरविलेल्या मुहूर्तावर लागतात, हा संशोधनाचाच विषय आहे.

तालुका आणि जिल्हा पातळीवरील राजकीय नेत्यांना आपल्या राजकीय कार्यक्षेत्रातील प्रत्येक कार्यकर्ता हा जवळचाच असतो. मात्र, प्रत्येक कार्यकर्त्याला फक्त तालुक्यातीलच अथवा राजकीय नेत्यांच्या कार्यक्षेत्रातीलच सोयरीक मिळेल असे मात्र होऊ शकत नाही. त्यामुळे राजकीय नेत्यांनाही लग्नसमारंभांना उपस्थित राहण्यासाठी मोठी धावपळ करावी लागते. एकाच दिवशी जर अनेक लग्नातील वर राजकीय नेते मंडळींची ही दमछाक होते.

शेवटी वेळेची आणि अंतराची मर्यादा त्यांनाही येतात. कारण काही लग्न ही दूरची असतात, परंतु कार्यकर्त्यांची मर्जी राखणे हेही तितकेच महत्त्वाचे असल्यामुळे मग राजकीय नेत्यांनाही नाईलाजास्तव लग्नाला उशीर होतो, परंतु यामुळे लग्न सोहळ्याकरिता उपस्थित राहणारे हजारो वऱ्हाडी मंडळी यांना काहीच महत्त्व नाही का, असाही प्रश्न निर्माण होतो.



## धुळ्यातील होमगार्ड पथक कार्यालयात मतदार जनजागृती

**धुळे, दि.१– मतदार जनजागृती कार्यक्रमांनुसार शहरातील होमगार्ड पथक कार्यालय येथे मतदार जनजागृतीचा कार्यक्रम संपन्न झाला. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी धुळे शहर मतदारसंघाच्या सहायक निवडणुक निर्णय अधिकारी सीमा अहिरे, स्वीप नोडल अधिकारी तथा परिविक्षाधिन नायब तहसिलदार मनोज जमदाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.**

यावेळी मास्टर ट्रेनर दिनेश सैदाणे यांनी (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -62,950 रु.+3% GST
सोने- 24 K -68,500 रु.+3% GST
चांदी- 76,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

डॉ.अरुण साळुंके-नेत्रतज्ञ यांचा डोळ्यांचा
दवाखाना व हॉस्पिटल पुर्ववत सुरु
आज ता.२/४/२०२४ मंगळवार पासून डॉ.अरुण साळुंके नेत्रतज्ञ यांचे डोळ्यांचा दवाखाना पूर्ववत सुरु होत आहे. (डॉक्टरांच्या हाताला फॅक्चर झाले होते म्हणून दवाखाना बंद होता) दवाखाना वेळ : फक्त सकाळी ११ ते १ पर्यंत
डॉ.अरुण साळुंके, ग.नं.५, धुळे

# आपला महाराष्ट्र

## निसर्ग, नियती, पाणी आणि माणूस

गेल्या काही दिवसांपासून दक्षिण आफ्रिकेची राजधानी केपटाउन येथील पिण्याच्या व वापरावयाच्या पाण्याच्या कथा वाचायला मिळत आहेत. केपटाऊन मध्ये तिथले प्रशासन एप्रिल २०२३ पासून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यास असमर्थ ठरले आहे. तिथल्या लोकांना आता आंघोळ करण्यास परवानगी नाही. आपल्याकडे ज्याप्रमाणे डिझेल आणि पेट्रोल पंपावर मिळते तसे पाणी केपटाऊनला मिळते. ही तीव्र पाणी टंचाई केव्हा दूर होईल ते त्या लोकांनाही माहिती नाही. हा सगळा मानवी हव्यास आणि निसर्गाशी बेजबाबदारपणे चालू असलेला खेळ याचा परिणाम आहे. केपटाऊन आपल्यापासून खूप दूर असल्याने त्याची झळ आपल्याला पोहचत नाही हे खरे आहे. मात्र आज ते शहर जात्यात आहे आपण सुपात आहोत, उद्या आपणही जात्यात असू आणि भरडले जाऊ. पण सुधारणार केव्हा असा प्रश्न आहे. निसर्गाचे शोषण नाही थांबवले तर नियती कुणालाच सोडणार नाही. त्या परिस्थितीचा पहिला फटका पाण्याबाबत बसणार आहे. विकासक असा मोठा शब्द आपल्याकडे वापरला जातो. ते विकासक नदी, जंगल, खनिज, वाळू, काहीच सोडत नाहीत. तलाव ताब्यात घेऊन घरे बांधतात आणि खिसे भरतात. हरिद्वार, ऋषिकेश, केदारनाथ, चमोलीचा जल उद्रेक विकासक, अधिकारी आणि निवडून पाठविलेले लोक प्रतिनिधी यांच्यामुळे घडला. कारण गंगा, यमुनेच्या, अलकनंदा नदीच्या पात्रात किंवा काठावर व्यावसायिक रिसॉर्ट, घरे, हॉटेल्स बांधण्यास परवानगी दिली. मग पाणी जाणार कुठे? हा झाला जल प्रलयाचा मुद्दा पण जिथे पाणीच उपलब्ध होत नाही अशी अवस्था करून ठेवली त्यावरचा उपाय करण्याच्या ऐवजी शहरांच्या आसपासचे जलस्त्रोत ताब्यात घेऊन ते कोरडे करण्यात आले आणि त्यात बांधकामे करण्यात आली. कोण तक्रार करणार आणि कोण निराकरण करणार? चोरच जर व्यवस्थेत बसलेले असतील किंवा त्यांच्याच हातात तिजोरीच्या चाब्या दिल्या असतील तर काय होईल? बंगळूर हे मोठे औद्योगिक आणि श्रीमंत शहर म्हणून ओळखले जाते. या शहरात खूप नैसर्गिक तलाव होते. आसपासची गावे शहरात आली आणि तलाव गायब झाले. त्यात मोठमोठ्या इमारती बांधल्या. परिणामी पावसाचे पाणी शहरात घुसू लागले. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत आटले. आज बंगळूरूमध्ये कपडे धुण्यास परवानगी नाही. पाच हजार रूपये दंड आहे. याच पध्दतीने तलावचे शहर म्हणून ओळखले जाणारे भोपाळ शहर आहे आणि ते देखील अवगुंठीत होत आहे. सध्या भारतीय हवामानात प्रचंड बदल झाले असल्याने कुठे अतिवृष्टी, कुठे दुष्काळ अशी स्थिती आहे. चेरापुंजी हे असे एक गाव आहे की, तिथे सर्वाधिक पाऊस पडतो. परंतु उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी मिळत नाही. याचे कारण हिमालयात पावसाचे पाणी थांबत नाही आणि ते जिरविण्याचे कुठलेच प्रयत्न झाले नाहीत. अशा प्रकारची अनेक उदाहरणे देता येतील. सरकार, समाज व प्रशासनाची अनास्था त्यास कारणीभूत असून भविष्यात त्यांच्या अनास्थेमुळे सर्व सामान्य माणूस अडचणीत येणार आहे. जे लोक पाण्याचे काम करतात त्यांच्या ऋणात आपण असले पाहिजे कारण त्यांचे अनंत उपकार आपल्या देशावर आहेत.

आणखी महत्वाची बाब म्हणजे आपला शेजारचा हिमालयातील पूर्वोत्तर प्रदेशात असलेला देश म्हणजे भूतान होय. हे बौध्द राष्ट्र असून तिथे अजून राजेशाही जिवंत आहे. निसर्ग सुंदर असा हा प्रदेश अवलोकन करण्यासाठी आपल्या देशातून खूप लोक जातात. तिथे जाण्यासाठी व्हिसा लागत नाही. अशा देशात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली आहे. उष्णतेने बर्फाचे ग्लेशियर घसरतात त्यापासून तयार झालेले पाणी उपयोगाचे नाही. पावसाळा जुलै महिन्यात सुरू होतो. परंतु गेल्या वर्षी जुलै महिन्याच्या आधीच पाऊस सुरू झाला आणि संपला देखील. त्यामुळे जी टंचाई निर्माण झाली ती आता जाणवते आहे. आठशे विद्यार्थी असलेल्या शाळेत पाण्याची सोय नसल्याने विद्यार्थी सोबत पाण्याची बाटली घेऊन जातात आणि प्रसाधनासाठी वापर करतात. भविष्यातील ही कुवार्ता म्हणावी लागेल. पावसाळ्यापूर्वीच अवकाळी पाऊस पडावा आणि निघून जावा, पुन्हा येऊच नये. आलाच तर त्याचा वेग प्रचंड असतो. सगळी शेतातली पिके उध्वस्त करून जातो. भूतान अशा प्रकारच्या संकटांशी सामना करीत आहे. १९९४ साली भूतानमध्ये प्रचंड जल प्रकोप झाला होता. त्यात गावेच्या गावे उध्वस्त झाली. झालेले नुकसान भरून काढण्यासाठी खूप वेळ गेला. काही एनजीओ पाण्यासाठी काम करीत आहेत. छोटे छोटे झरे संरक्षित करून त्यातून स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. काही ठिकाणी पावसाचे पाणी थांबवून साठा तयार करण्यात येतो परंतु जंतूचे भय असते त्यामुळे हे पाणी पिण्यासाठी वापरत नहीत. म्हणून पिण्याच्या पाण्याचे संकट आणखी गडद झाले आहे. भूतान हा वेगळा देश असला तरी जलपाईगुडी पासून तो फक्त साठ किलोमीटर अंतरावर आहे म्हणजे आपल्या देशातील हिमालयास समांतर आहे. याचा अर्थ ती परिस्थिती आमच्याही देशात आहे पण सरकार ती दिसू देत नाही. अमृत काळात ७५ अमृत जलसाठे तयार करण्याची घोषणा फक्त लोकप्रियता कमवण्यासाठी झाली प्रत्यक्षात काहीच झाले नाही. सरकारला धर्मरक्षणा शिवाय दुसरा कार्यक्रम दिसतच नाही. सामान्य माणूस गेला उडत. अशी आपल्या देशाच्या राजकारणाची अवस्था आहे.

खान्देशातील अवस्था भूतान पेक्षा वेगळी नाही. असंख मध्यम प्रकल्प आणि बॅरेजेस आहेत. धरणे भरत नाहीत आणि बॅरेजेसचे पाणी फक्त डोळ्यांना सुखावते. त्याचा फारसा उपयोग होत नाही परिणामी पावसाळ्यात आपल्याकडे टँकर चालू असतात. शिवाय जल संधारणाची सोय करण्यासाठी कोणी तयार नाही. शिरपूर तालुक्यातील अमरिशभाई पटेल यांनी केलेले प्रयोग सोडले तर सर्वत्र बोंबाबोंब आहे. त्यांनी मृदा आणि जल संधारणाचे काम ईतके करून ठेवले आहे की, पुढच्या पिढ्यांना चिंता सतावणार नाही. पळासखेड, सेलू, राळेगण सिध्दी, तसेच विदर्भातील अनेक ठिकाणी तसे प्रयोग झालेले आहेत. पण हे प्रयोग म्हणूनच उरले असून त्याचे अनुकरण इतरांनी केलेले नाही. याचा अर्थ आमची मानसिकता फुकटच्या मिळणाऱ्या धान्यामुळे बदलली आहे. आम्ही ऐतखाऊ झाल्याने पुढची पिढी देखील ऐत खाऊ होईल असे दिसते. तसे होऊ नये म्हणून वैचारिक दृष्ट्या प्रगल्भ लोकांनी हा देश वाचविण्यासाठी पुढे आले पाहिजे अन्यथा निसर्ग आणि नियती आपल्याला माफ करणार नाही.

## साने गुरुजी महाविद्यालयातील रासेयोतर्फे स्वच्छता अभियान व मतदान जागृती अभियान उपक्रम

**शहादा, दि.१ (का.प्र.)– युवक व क्रीडा मंत्रालय भारत सरकार, रासेयो प्रादेशिक संचालनालय पुणे, रासेयो कक्ष कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शहादा येथील राष्ट्रीय सेवा योजना एकक यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता कृती योजना अंतर्गत स्वच्छता अभियान व शहीद दिनानिमित्त मतदान जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**



याप्रसंगी शहादा तहसील कार्यालय येथील स्वीपचे नोडल अधिकारी डॉ.योगेश सावळे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय निवडणूक कार्यक्रमात मतदान जनजागृतीसाठी आपले योगदान द्यावे व आपण स्वतः मतदान करावे असे आ– वाहन केले. तसेच पथनाट्याद्वारे, रॅलीद्वारे तसेच सोशल मीडियाच्या मदतीने मतदार जनजागृती करावी असे सूचित केले. शहादा येथील नायब तहसीलदार शैलेंद्र गवते यांनी नव मतदार नोंदणीसाठी निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या सोप्या प्रक्रियेसंबंधी मार्गदर्शन केले व सर्वांना येणाऱ्या निवडणूक या राष्ट्रीय उत्सवात सहभागी होणेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.एम. के. पटेल यांनी रासेयो विभागातर्फे मागील दोन महिन्यांत रॅली, पथनाट्य, पोस्टर, घोषवाक्य, ई–शपथ आदी माध्यमातून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. उपस्थितांनी रासेयो विभागाचे अभिनंदन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. राजेंद्र पाटील यांनी नंदुरबार जिल्हयात १३ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत महाविद्यालयाचे ५० हून अधिक स्वयंसेवक समाज कल्याण अधिकारी यांच्या आवाहनास प्रतिसाद म्हणून बूथवर मदतीसाठी सेवा देणार असल्याची माहिती दिली. सर्वांनी स्वच्छता शपथ व मतदार शपथ घेतली. यासोबतच महाविद्यालयात युवकांनी तसेच नागरिकांनी मतदान प्रकियेत उत्साहाने सहभाग नोंदवावा म्हणून वोटर सेल्फी पॉईंट उभारण्यात आ– लेला आहे. सर्व विद्यार्थ्यांना सेल्फी पॉईंट वरून फोटो घेऊन आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर पोस्ट करून जनजागृती करावी असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी क.ब.चौ.उ.म.वि. जळगाव रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.के. पटेल यांनी मार्गदर्शन केले. पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, सचिव श्रीमती कमलताई पाटील, समन्वयक प्रा.मकरंद पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मयूरभाई दीपक पाटील, प्राचार्य डॉ.एम.के. पटेल, उपप्राचार्य डॉ.एस.डी. सिंदखेडकर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. राजेंद्र पाटील, प्रा.डॉ.वर्षा चौधरी, प्रा.डॉ.वजीह अशहर व रासेयो स्वयंसेवकांनी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## आर.सी.पटेल अभियांत्रिकीत जल जागृती सप्ताह उत्साहात

**शिरपूर, दि.१– येथील आर.सी.पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयात अभियांत्रिकी स्थापत्य विभाग व महाराष्ट्र शासन लघु पाटबंधारे उपविभाग शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जल जागृती सप्ताह साजरा करण्यात आला.**

महाविद्यालयात सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय नाशिक यांच्या सूचनेसार महाराष्ट्र शासनातर्फे जल जागृती सप्ताह साजरा करण्यात आला असून आर.सी.पटेल महाविद्यालयात जल जागृती सप्ताह साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासन लघु पाटबंधारे उपविभाग शिरपूर येथील उपअभियंता वरुण राजेंद्र पवार, कनिष्ठ अभियंता नारायण प्रल्हाद गावित, सहाय्यक अभियंता सौरभ चंद्रकांत कदम, रिटायर्ड शाखा अभियंता सखाराम दशरथ माळी, महाविदयालचे संचालक डॉ. जे.बी.पाटील, उपसंचालक डॉ. पी.जे.देवरे, विभाग प्रमुख प्रा.जी. व्ही.तपकीरे, स्थापत्य विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

पाण्याची बचत व्हावी, पाण्याचे महत्त्व व भविष्यातील पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी उपलब्ध पाण्याचे संवर्धन करणे, नदी–नाले यांना प्रदूषणमुक्त करणे, लाभक्षेत्रामध्ये पाणी वापर संस्था करणे, पीक पध्दती व पाण्याचे नियोजन करणे, पाणीपट्टी वसुलीबाबत जनजागृती करणे, याकरिता समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी जागतिक जलदिन म्हणून साजरा करण्यात आला. जलसंपदा विभागामार्फत कार्यक्रमात उपअभियंता वरुण पवार यांनी विद्यार्थ्यांना जल जागृती सप्ताह विषयी मार्गदर्शन केले. अभियंता सखाराम दशरथ माळी यांनी जल जागृती संदर्भात विद्यार्थ्यांची भूमिका व सामाजिक बांधीलकी तसेच शिरपूर ग्रामीण भागात आमदार अमरिशभाई पटेल यांनी राबविलेल्या शिरपूर पॅटर्न चे महत्व विषद केले. त्यामुळे भूगर्भात पाण्याच्या पातळीत वाढ झाली व स्थानिक शेतकरी समृद्ध झाला असे सांगितले. तसेच सर्वांनी मिळून जल शपथ देखील घेतली. कार्यक्रमात तृतीय वर्षातील विद्यर्थिनी प्रेरणा जाधव व दिशा चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले. आभार विभाग प्रमुख प्रा.जी.व्ही. तपकीरे यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा.महेश पाटील, प्रा.मनोज पाटील व समन्वयक विद्यार्थांनी केले.



## धुळ्यातील क्रीडा संकुलात वॉटर योगाचा शुभारंभ

**धुळे, दि.१– आरोग्याला पुरक असणारा वॉटर योगाचा नूतन वर्षाचा शुभारंभ आज जिल्हा क्रिडा संकुलातील जलतरण तलावात योगगुरु डॉ.जगदिश गिंदोडिया यांच्या हस्ते ज्येष्ठ योग साधक महेश घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.**

आवड असली की सवड मिळतेच, ज्यांना आपल्या धकाधकीच्या जीवन प्रवाहात स्वतःच्या शरीर संवर्धनासाठी दिवसभरात वेळ मिळत नाही त्यांनी पहाटे एक तास वॉटर योगा केला तर कोणत्याच कारणास्तव डाक्टरकडे जाण्याची गरज पडत नसल्याचे डॉ.गिंदोडिया यांनी यावेळी सांगितले. वॉटर योगा ही प्रामुख्याने अबालवृद्ध स्त्री पुरुषांच्या आरोग्याची गुरूकिल्ली असल्याने योग साधकांना जलतरण तलावाच्या संचालकांनी झूकते माप द्यावे अशी अपेक्षा घुगे यांनी यावेळी व्यक्त केली. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी योग साधकांना आणि जलतरण तलावाच्या लाभार्थीना शुभेच्छा कळविल्याचेही घुगे यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी आर.एन. सुगंधी, आर.एन. पाटील, एच.ए. पाटील, पद्धरीनाथ चित्ते, दिलिप गांधी, सुभाष गुजराथी गुजराथी, रमेश मोरे, नंदकिशोर गुजराथी, सोहम घुगे, जयेश देशमुख आदी साधकांनी वॉटर योगात सहभाग घेतला. महारु आघाव आणि समीर आघाव यांनी योगदान दिले. जलतरण तलावाचे संचालक सागर आघाव यांनी योग साधकांचे स्वागत केले.

## शेती विषयाचा संविधानाच्या मूलभूत अधिकारात समावेश करा : राज्याध्यक्ष अशोक सब्बन

**शहादा, दि.१ (प्रतिनिधी) – नैसर्गिक साधन सामुग्रीने सधन असलेला कृषीप्रधान भारत देशातील सुमारे ६५ टक्के जनसंख्या शेती व शेतीवर आधारीत आहे. या शेतीवर आधारीत लोकांसाठी संविधाच्या मुलभूत अधिकारातच शेती (कृषी) या विषयाचा समावेश करण्यात यावा अशी मागणी भारतीय जनसंसद राज्य अध्यक्ष अशोक सब्बन यांनी केली आहे.**



भारतीय जनसंसदची नुकतीच राज्यव्यापी बैठक अहमदनगर येथे झाली. या बैठकीत देशात सर्वकष असा शेतकऱ्याच्या संपूर्ण हिताचा शेतकरी संरक्षण कायदा (किसान संरक्षण कानून) संसदेत मांडावा व संविधानाच्या मूलभूत अधिकारामध्ये याचा समावेश करावा. तसेच या शेतकरी संरक्षण कायद्या मध्ये कोणते कोणते मुद्दे असावेत या संदर्भात व्यापक चर्चा करण्यात आली. यावेळीभारतीय जनसंसदेचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन, कृषीतज्ञ व कायदेतज्ञ डॉ.मुकुंदराव गायकवाड, कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे, ड.कारभारी गवळी, अहमदनगर जिल्हाध्यक्ष सुधिर भद्रे आदी उपस्थित होते.

तसेच या शेतकरी संरक्षण कायद्यामध्ये जमिन महसूल व शेतकऱ्यांच्या फसवणूकीच्या संदर्भातील न्याय निवाडे जलद व स्वस्त न्याय मिळवून देणारे शेतकरी न्यायालयाची स्था– पना करणे, मशागतीची यंत्रसामुग्रीची वाजवी मुल्यात उपलब्ध करणे व मशागती पा– सून तर सुगी पश्चात सर्व कामाचा समावेश कायद्यात करणे, बांधावर तंत्रज्ञान उपलब्ध करणे, उच्चप्रतीची बी, बियाणे, खते, औषधे वाजवी दरात मुबलक प्रमाणात उपलब्ध करणे, शेअर मार्केट प्रमाणे कृषी उत्पन्नाची सविस्तर ऑन लाईन व टि.व्हीवर सर्रास डिस्पेले करणे, साठवणूक, वाहतूक, विक्रीव्यवस्था, कृषीउत्पन्नवर मुल्यवर्धित प्रक्रीया उद्योग फक्त शेतकऱ्यांनसाठी राखीव ठेवणे, कृषी साठीच्या सर्व मुलभूत सुविधा जसे रस्ते, वीज, पाणी, तंत्रज्ञान इ.मागणी प्रमाणे तात्काळ उपलब्ध होणे. बाजार समित्या व शेतकऱ्यांच्या मार्केटिंग कंपन्याचे सक्षमीकरण करणे.

कृषीपुरक सर्व उद्योग धंद्याचे सक्षमीकरण करणे, शेतकरी आरोग्य सुविधा, कृषीपुरक पशु, पक्षी इ.अशा अनेक शेती व शेतकऱ्यांच्या कामा विषयी असलेल्या सर्व बाबीसाठी सक्षम असा कायदा निर्माण करण्यासाठी ड्राफ्ट करण्येचे काम चालू आहे. या कायद्याच्या मसूदा निर्मिती बरोबरच जनमत जगृतीसाठी अनेक तज्ञ व भारतीय जनसंसदेचे राज्यभरातील कार्यकर्ते कार्यरत असल्याची माहिती नंदुरबार जिल्हाध्यक्ष एकनाथ गिरधर पाटील यांनी दिली.





## आर.सी. पटेल फार्मसीच्या दोन विद्यार्थ्यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

**शिरपूर, दि.१– आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालयातील दिशा दो– शी व अनमोल दराक या दोघ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र स्टुडन्ट इनोवेशन चॅलेंज स्पर्धेत जिल्हास्तरावर विजय होऊन यश प्राप्त केले असून**

त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याबद्दल त्यांचा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते १ लाख रुपयांचा धनादेश व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी खा.डॉ. सुभाष देवरे, जि.प.अध्यक्षा धरती देवरे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल आदी उपस्थित होते. या विद्यार्थ्यांना प्रा.डॉ. उज्वलदीप व्ही. देवरे यांचे समन्वयक म्हणून मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगप– ती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, माजी कुलगुरु डॉ.के.बी.पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.जे.सुराणा, प्राचार्य डॉ. नितीन हासवानी, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व कर्मचारी यांनी कौतुक केले.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

### शब्दकोडे क्रमांक.१८९७



**आडवे शब्द :** १.पाठीच्या कण्याच्या अखेरीस असलेले हाड ४.दैना ८.नायक ९.मोजणी १०.लहान १२.सगेसोयरे १४.चांगला १६.हाक १७.एकाहून जास्त नायिका वा ताऱ्यांचा समूह १९.मनुष्य २१.मरण देवता २३.शपथ २४.जव २६.तीन दशकांची संख्या २९.श्रृंगार ३०.मैथुन ३२.मैल ३३.फुलातील रजक कण ३५.जिन्नस ३६.यमाची बहीण ३८.गुपित ३९.दम ४०.पाप ४२.गरज ४४.कर ४५.पाण्याने भरलेला खंदक ४८.तीर ४९.देहाचे निरनिराळे हिस्से ५०.सवय ५२.चहा गोड होण्यासाठी वापरतात ५३.एक बसण्याचे साधन ५४.पाहीजे असलेला ५५.निशा ५६.भांडण ५८.नुतन

**उभे शब्द :** १.माणूसकी २.कुटील डाव ३.दैना ४.निश्चय ५.ढिग ६.करंटा ७.ठेकेदार ९.आकाश ११.कालवण १२.चौक १३.फिरती जात १५.हिंदीत-उपदेश १८.रतन २०.उमर २२.बुदधी २३.सदय सुरू असलेला दिवस २५.तमाश्यात सादर होणारे नाटय २७.देवापुढे तेवणारा एक दिव्याचा प्रकार २८.कोना २९.भाजी ३०.आपल्या अवती भवतीचा समूह ३७.वानर ४०.धार्मिक ग्रंथाचे केलेले वाचन ४२.तके फु-उलट लिहा ४३.हिंदीत- ढेकर ४४.प्रामाणिक मनुष्य ४६.ताकदवर ४७.अस्लाव्यस्ल पडलेले सामान ४९.कैद ५२.शेती जोमाने येण्यासाठी वापरले जाणारे खादय ५३.भिंतीवर राहणारा एक जीव ५७.इंग्रजीत-पाहणे

**शब्दकोडे क्रमांक.१८९६ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | ध | क | | अ | द्र | क | | चि | रं | त | न |
| ध | र | प | क | ड | | मी | ठ | | ज | म | |
| ना | | ब | | स | म | ज | | चा | क | | स |
| | व | शी | क | र | ण | | धा | क | | स | म |
| ज | री | | रा | | का | ठ | | र | वि | वा | र |
| न | | प | टे | ल | | रा | ग | | शा | ल | |
| न | ख | रा | | ल | गा | व | | ज | ल | | उ |
| | रा | त | | का | ठ | | भू | ल | | प | पा |
| दा | ब | | ना | री | | आ | | द | य | नी | य |
| दा | | ख | रा | | का | क | डी | | म | र | |
| | मा | | ज | व | | ल | | वा | रा | | ग |
| स | ह | ज | | ज | मा | न | त | | ज | व | ळ |






**पान १ वरुन**

## चौधरींच्या दणक्यानंतर पूर्ववत

अध्यक्ष श्याम सनेर यांच्या नेतृत्वाखाली चौधरी यांचेसह प्रा.सूरेश देसले, शहर अध्यक्ष दिनेश माळी आणि अन्य कार्यकर्त्यांनी उपोषण करून आक्रमकपणे या प्रश्नाकडे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. त्यानुसार पंधराव्या वित्त आयोगातून ११ लाख ४२ हजार रुपये या इमारतीच्या दुरूस्तीसाठी मंजूर झाले. या निधीतून इमारतीची आता दूरूस्ती होत आहे.

ही दुरूस्ती करतांनाही यंत्रणेने आपला दळभद्रीपणा करायला सुरूवात केलीच होती. बाहेर पेव्हर ब्लॉक बसवतांना धम्मस न करता तुकडे बसविण्याचा प्रकार सुरू होता. सदर बाब माळीवाड्यातील कैलास वाघ आणि अन्य सामाजिक कार्यकर्ते यांच्या लक्षात आली. त्यांनी संबंधितांना याबाबत समज दिली. मात्र हो हो म्हणत काम जैसे थे सुरू ठेवले. या कार्यकर्त्यांनी कामांचा व्हिडिओ काढून सुनील चौधरी यांचेकडे तक्रार केली. चौधरी यांनी त्वरीत दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क करीत ही गंभीर बाब लक्षात आणून दिली आणि हा प्रकार खपवून घेतला जाणार नाही असा दमच दिला. त्यानुसार आता हे काम योग्य प्रकारे केले जात आहे.

## मतदार जनजागृती

व्होटर हेल्पलाईन ॲपद्वारे फॉर्म नंबर सहा, सात व आठ कसा भरावा त्याप्रमाणे मतदार यादीत नावात तसेच इतर बदलाबाबत माहिती दिली. तसेच अठरा वर्ष वयातील नवमतदाराची नावे नोंदविण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. शाहीर सुभाष कुलकर्णी यांनी अहिराणी गीतातून मतदाराचे प्रबोधन कार्यक्रम सादर करुन मतदानाचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमांस नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला. यावेळी मास्टर ट्रेनर दिनेश सैदाणे, शाहीर सुभाष कुलकर्णी, संरक्षण अधिकारी राकेश नेरकर, संदीप मोरे, आदी उपस्थित होते.

# पटेल आयएमआरडीमधील बी.एम.एस.चे चोवीस विद्यार्थी विद्यापीठात प्रथम दहा क्रमांकात झळकले

**शिरपूर, दि.१- आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आय.एम.आर.डी. परिसंस्थेतील बी.एम.एस.च्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठस्तरीय परिक्षेत २४ विद्यार्थ्यांनी प्रथम दहा क्रमांकात उत्तुंग यश मिळवुन आय.एम.आर.डी.च्या उत्कृष्ट निकालाची यशस्वी परंपरा अबाधीत राखली.**

आय.एम.आर.डी. परिसंस्थेतील विद्यार्थी सतत विविध प्रकारच्या कॉम्पुटर आणि मॅनेजमेंट क्षेत्रातील अभ्यासक्रमात गुणवत्ता यादीत झळकत असतात. बी.एम.एस. प्रथम वर्षामधून परिसंस्थेतील १० विद्यार्थ्यांनी विदयापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम दहा क्रमांकात येण्याचा बहुमान प्राप्त केला. कुंभार शुभांगी गरबड हिने ९.७१ सीजीपीए व ८२.७१ टक्के गुण मिळवून विद्यापीठात व परिसंस्थेत प्रथम, अग्रवाल दर्शन अजय ९.२९ सीजीपीए व ८१.२९ टक्के विद्यापीठात व परिसंस्थेत द्वितीय, निकम जितेंद्र अनिल ९.१४ सीजीपीए व ७७.४३ टक्के विद्यापीठात व परिसंस्थेत तृतीय स्थान मिळविले.

बी.एम.एस. द्वितीय वर्षामधून परिसंस्थेतील ९ विद्यार्थ्यांनी विदयापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम दहा क्रमांकात येण्याचा बहुमान प्राप्त केला. राजपूत दर्शना मुलसिंग हिने ९.४४ सीजीपीए व ८१.३६ टक्के विद्यापीठात व परिसंस्थेत प्रथम, पवार रोशनी सुनील ९.३५ सीजीपीए व ८०.३२ टक्के विद्यापीठात व परिसंस्थेत द्वितीय, पाटील विवेक विनोद ९.२१ सीजीपीए व ७९.०९ टक्के विद्यापीठात व परिसंस्थेत तृतीय स्थान मिळविले.

बी.एम.एस. अंतिम वर्षामधून परिसंस्थेतील ५ विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम दहा क्रमांकात येण्याचा बहुमान प्राप्त केला. पवार हितेश नामदेव ९.४३ सीजीपीए व ७९ टक्के विद्यापीठात व परिसंस्थेत प्रथम, जैन यश दीपक ९.०० सीजीपीए व ७६.२८ टक्के विद्यापीठात व परिसंस्थेत द्वितीय, गोसावी साक्षी सुरेशगीर ८.५७ सीजीपीए व ६८.४२ टक्के विद्यापीठात पाचवा व परिसंस्थेत तृतीय स्थान मिळविले.आय.एम.आर.डी. परिसंस्थेमधील पदवी विभागातून बी.एम.एस. वर्गातील विद्यार्थी विद्यापीठात प्रथम तीन क्रमाकाने उत्तीर्ण झाले आहेत.

या यशाबददल माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, माजी कुलगुरु डॉ.के.बी.पाटील, परिसंस्थेच्या संचालिका डॉ.वैशाली पाटील, प्रा.मनोज बेहेरे, डॉ.मनोज पटेल, डॉ.तुषार पटेल यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांना प्रा.सचिन सुराणा, प्रा.विजय गर्गे, प्रा. अमर गौर, प्रा.योगेश सेठिया, प्रा.दिनेश बोरसे, डॉ.प्रियांका भंडारी, डॉ. लक्ष्मीकांत शर्मा, प्रा.सुफियान बागवान, प्रा.कौस्तुभ सावंत, प्रा.सुमित सगळे, प्रा.मिलिंद पाटील, प्रा. मोनाली किरंगे, डॉ. रुपाली अग्रवाल, प्रा.कीर्तिका बेहेरे या प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

# खा.डॉ.गावित यांना मताधिक्याने जिंकवणार; प्रमुख नेत्यांचा निर्धार

**नंदुरबार, दि.१ (प्रतिनिधी) - गाव विकासाच्या आणि वैयक्तिक व समूह विकासाच्या विविध योजना राबवून केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून मागील दहा वर्षात खासदार डॉ.हिना गावित यांनी केलेला विकास निश्चितच नंदुरबार जिल्ह्याचा कायापालट करणारा आहे. त्या बळावर आपण ही निवडणूक जिंकणारच. तरीही प्रत्येक पन्ना प्रमुख, बुथ प्रमुख पासून गाव पातळीवरच्या आणि तालुका पातळीवरच्या समितीप्रमुखांपर्यंत प्रत्येकाने परिश्रम घेणे अगत्याचे आहे, असे नमूद करून यंदाच्या निवडणुकीत खासदार डॉ.गावित यांना चार लाखाहून अधिक मताधिक्याने जिंकवणार, असा निर्धार भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकारी व समिती प्रमुखांसह नेत्यांनी व्यक्त केला.**

लोकसभा निवडणूक पदाधिकारी नियोजन बैठक नुकतीच नंदुरबार येथील कन्यादान मंगल कार्यालयाच्या सभागृहात पार पडली. त्या सभेत हा निर्धार व्यक्त करण्यात आला. भारतीय जनता पार्टीचे उत्तर महाराष्ट्र क्लस्टर प्रमुख तथा मंत्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, भाजपाचे महामंत्री विजय चौधरी, नंदुरबार जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष डॉ. सुप्रिया गावित, खासदार डॉ.हिना गावित, आमदार काशीराम पावरा, काँग्रेस मधून भाजपात आलेले माजी मंत्री पद्माकर वळवी, धुळे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा भाजपा चे लोकसभा प्रभारी तुषार रंधे, भाजपाचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष निलेश माळी व धुळे जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र गावित, प्रदेश समिती सदस्य डॉ शशिकांत वाणी, नागेश पाडवी आणि अन्य मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

# राष्ट्रनायक हे हिंदुस्थानचे विद्यापीठच : राजा महाराज

**नंदुरबार, दि.१ (प्रतिनिधी) - राष्ट्रनायक विर शिरोमणी महाराणा प्रताप तसेच छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण देशाचे विद्यापीठच आहे. या विद्यापीठात जे शिकतील तो माणूस म्हणून मोठा होईल, असे प्रतिपादन शिव व्याख्याते राजा महाराज शेंडे यांनी केले. ते हिंदु सेवा सहाय्य समितीचा तृतीय वर्धापन दिनानिमित्त आयोजित गाथा वीर हिंदु योद्धांची या कार्यक्रमात बोलत होते.**

डॉ.काणे गर्ल्स हायस्कूल मैदानावर रविवारी आयोजित जाहीर व्याख्यान कार्यक्रमाचा प्रारंभ घोषणा, प्रेरणामंत्राने झाली. व्यासपीठावरील वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह, छ.शिवाजी महाराज, छ.संभाजी महाराज यांचा प्रतिमेचे पूजन आणि मशाल प्रज्वलित करून राजा महाराज शेंडे आणि हिंदु सेवा सहाय्य समितीचे डॉ.नरेंद्र पाटील यांनी सुरुवात केली. डॉ.नरेंद्र पाटील यांनी कार्यक्रम आयोजन महत्व तसेच हिंदु सेवा सहाय्य समितीचा कार्य आढावा प्रास्ताविकातुन मांडला.राजा महाराज पुढे म्हणाले की, महाराणा प्रताप व छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदू धर्माचा, आपल्या स्वाभिमानाचा जागर घडविला. त्यामुळे ते माणूस म्हणून राजा म्हणून एक आदर्श व्यक्ती घडले. राष्ट्रमाता जिजाऊने छत्रपती संभाजी व छत्रपती शिवाजी महाराजांना या पवित्र भूमी पुन्हा एकदा स्वर्ण सिंहासन संस्थापित करण्याचे शिकवण व शिक्षण दिले. त्या छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रेरणास्रोत विर शिरोमणी महाराणा प्रताप होते. ज्या घरात महापुरुषांच्या चरीत्राचे वाचन होते ते घर राष्ट्राच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील असते ही जमेची बाजू आहे. महाराणा प्रताप व छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य धर्मराज्य होते. कारण या धर्म राज्यात अठरापगड जातीचा समावेश होता. त्रेता युगातील भगवान श्री रामचंद्र यांचे चरित्र द्वापर युगातील भगवान श्रीकृष्ण यांची राज नीती ज्या व्यक्तिमत्वामध्ये एकवटली होती ते व्यक्ती म्हणजे कलियुगातील विर शिरोमणी महाराणा प्रताप व पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराज. म्हणूनच राष्ट्र पुरुषांची गाथा आपल्या शरिराच्या नसानसात एकवटली पाहिजे असे ते म्हणाले.

## निधन वार्ता

### सजन पाटील



शहादा, दि.१- तालुक्यातील वडाळी येथील स्वातंत्र्यसैनिक सजन भिला पाटील (९२) यांचे २९ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते वडाळीचे माजी सरपंच दीपक पाटील व डॉ. कल्याण पाटील यांचे वडील होत.


||अभिष्टचिंतन||

२ एप्रिल

मा.श्री.राजेंद्र ओंकार मोरे

से.नि.सहा.पो. उपनिरीक्षक
चेअरमन,तक्रार निवारण समिती
सु.स.सेवा मंडळ

आपणास वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



ak media 238222

शुभेच्छुक

दिनेश शार्दूल, मा. नगरसेवक, मनपा, धुळे
दिपक शेलार, मा. नगरसेवक, मनपा, धुळे
पंडित मिस्तरी, कार्याध्यक्ष श्री विश्वकर्मा फाउं.
दिंगबर मिस्तरी, सेक्रेटरी, सु.स. सेवा मंडळ
दिपक आहिरे, अध्यक्ष, बिल्डर असो, धुळे
इंजि.दिनेश कुवर, उपाध्यक्ष श्री विश्वकर्मा फाउं.
इंजि. विलास मोरे, से.नि.उप कार्य अभियंता
नितीन कापडीस सर, सचिव, श्री विश्वकर्मा फाउं.
निलेश सुर्यवंशी (मामा), सदस्य, श्री विश्वकर्मा फाउं.
इंजि.विजय शेलार, खजिनदार, सु.स. सेवा मंडळ
सतिष खैरनार, सदस्य, श्री विश्वकर्मा फाउं.
राहुल देवरे (आबा), मा. सदस्य, श्री विश्वकर्मा संस्था,धुळे

शुभेच्छुक - मैत्री ग्रुप व प्रभु विश्वकर्मा समाज समन्वय समिती, धुळे.



विवेकानंद डोळ्यांचे हॉस्पीटल, धुळे चा सामाजिक कार्यक्रम

**वैश्विक आध्यात्मिक केंद्र (सर्व धर्म स्थळ)**

गोंदूर जवळ २० एकर शेतीसाठी पाहिजेत

१) सालदार- दरमहा पगार + अनुदान, २) निमबटाई- दरमहा पगार + उत्पन्नात टक्केवारी, ३) जुप- दरमहा पगार + संपूर्ण उत्पन्न करणाराचे, ४) ड्रायव्हर-चष्म्याच्या दुकानाचे मालक होण्याची सुवर्णसंधी, ५) हॉस्पिटलसाठी रात्रपाळी चौकीदार- महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चष्मा दुकानाचे काम शिकण्याची संधी, ६) सर्वधर्म स्वयंसेवक- स्वामी विवेकानंदांचा संदेश घरोघरी पोहचवणे.

वेळ घेवूनच यावे!

डॉ.राधेशाम रोडा जयहिंद कॉलेजरोड, देवपूर, धुळे 9511890155



**पाहिजे**
प्लंबिंग इंडस्ट्रीमध्ये सेलिंग साठी सेल्समन पाहिजे. पुरुष-१, कृपया अनुभव असलेल्या व्यक्तींनीच संपर्क करावा.
प्रितेश खंडेलवाल 8956998411

**पाहिजेत**
टाटा S साठी ड्रायव्हर ॲपेरिक्षासाठी ड्रायव्हर दुकान कामासाठी मुले समक्ष भेटा!
पूर्वा एजन्सीज
गल्ली नं.३, बॉम्बे लॉजमागे, धुळे

**प्लॉट विकणे आहे**
माहेश्वरी सोसायटी सर्व्हे नं.९१, प्लॉट नं.२४, साईबाबा मंगल कार्यालयाचे पुढे, नकाणेरोड, देवपूर, धुळे. प्लॉट-८५० स्क्वे.फुट योग्य भाव मिळाल्यास त्वरित विकणे आहे.
संपर्क : रमेश साळवे 7066559455

**पाहिजेत**
दुकान कामासाठी हुशार माणूस पाहिजेत. सेल्समन - १ हेल्पर - २
स्वर्ण पॅलेस ज्वेलर्स
आग्रारोड, सराफ बाजार,धुळे
02562-232428 233991

**पाहिजे**
पेट्रोल पंपावर साफसफाईसाठी माणूस लावणे आहे. कामाची वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत
-: संपर्क :-
9823210266


**पाहिजेत**
नर्सिंग मुले
ANM / GNM - 3
Ambulance DRIVER - 3
Paramedics
-: संपर्क :-
7588517991

**पाहिजेत**
निवासी सहकुटुंब राहणारा वॉचमन पाहिजे. निवासाची सोय आहे. गरजूंनी अर्जासह भेटा. दि.४/४/२०२४ गुरुवार रोजी दुपारी ४.०० वाजता. स्थळ : क्युमाईन विविध क्रिडा मंडळ, जेलरोड, धुळे
अध्यक्ष,
क्युमाईन विविध क्रिडा मंडळ, धुळे

**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**
गुढघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
दि.१ एप्रिल ते ६ एप्रिल २०२४ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत.
-: संपर्क :-
डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो)
शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे
फोन नं.०२५६२-२३५११३, भ्रमणध्वनी-०८६००३५१००० ९८८१२७८६९८

**पाहिजेत**
झेरॉक्स मशीन कामासाठी शिकाऊ मुले/मुली पाहिजेत. फुलटाईम/पार्टटाईम
श्री विष्णू प्रिंटींग प्रेस ॲन्ड झेरॉक्स
डॉ.संजय देसलेंच्या दवाखान्या शेजारी, वाडीभोकर रोड, धुळे
7709115682
9082420746

**पाहिजे**
हॉटेल इंडसीमध्ये मार्केटींग साठी फुलटाईम सेल्समन पाहिजे. पुरुष-१ कृपया अनुभव असलेल्या व्यक्तींनी संपर्क करावा.
आकाश निळे 9011495646



**प्लॉटस् विकणे आहेत**
देवपूर, वलवाडी, गोंदूर शिवारातील प्लॉटस् विकणे आहेत.
-: संपर्क :-
9130000913

**पाहिजेत**
कापड दुकानासाठी सेल्समन, सेल्सगर्ल, हेल्पर पाहिजेत. भेटा!
सोना मॅचिंग सेंटर
पारोळा रोड, धुळे, गोपाल टी हाऊस जवळची बोळ, धुळे
9890331890

**पाहिजेत**
रेडीमेड कापड दुकानासाठी हुशार व अनुभवी सेल्समन/हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार व इतर सवलती दिली जाईल.
ईश्वर गारमेन्टस्, धुळे
9423917461

**जागा भाड्याने देणे आहे**
फागणे बायपास हायवे टच २ ते ३ एकर जागा भाड्याने देणे आहे. चाळीसगाव हायवे टच दादावाडीच्या बाजुला ५०,००० स्क्वे.फूट जागा भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
इंजि.हर्षल देसाई
9359407097

**पाहिजेत**
दुकान कामासाठी वय १८ ते ३५ पर्यंत मुले पाहिजेत. आकर्षक पगार.
लक्ष्मी प्लास्टिक
अग्रवाल भवन शेजारी, हॉटेल तरंग समोर, शिवाजीरोड, धुळे
भेटण्याची वेळ : १ ते ४ पर्यंत

**विकणे आहे**
महिंदळे शिवारात स.नं.१०३/१ SRPF कॅम्प जवळ प्लॉट व रो हाऊस विकणे आहे.
-: संपर्क :-
9588485587
9766611456

**प्लॉट विकणे**
शहराच्या मध्यवर्ती भागात भव्य शॉपिंग मॉल, मल्टीप्लेक्स, हॉस्पीटलसाठी उपयुक्त प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे**
महावीर नगर, अग्रवाल नगर, जी.बी. नगर, स्नेहनगर येथील प्लॉट विकणे आहेत.
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे**
ग्रेनाईट, मार्बल, बिल्डींग मटेरियल शोरुमसाठी पारोळा रोडटच प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693


**पान १ वरुन**

## भारताची आत्मनिर्भरता वाढविणार

थोडी वेगळी होती. तेव्हा आपल्या बँकिंग क्षेत्रासमोर अनेक आणि मोठी आव्हाने होती. एनपीए आणि अस्थिर प्रणालीमुळे देशाची जनता भारताच्या बँकिंग क्षेत्राच्या भविष्याबाबत चिंतेत होती. कोलमडलेल्या बँकिंग क्षेत्रामुळे अर्थव्यवस्थेला कोणतेही सहाय्य मिळत नव्हते. देश एकाच वेळी दोन-दोन आघाड्यांवर लढत होता. परंतु, गेल्या १० वर्षांमध्ये स्थिती सुधारली आहे. आरबीआय आणि सरकारने मिळून केलेल्या कामांमुळे देशाच्या बँकिंग क्षेत्राने भरारी घेण्यास सुरुवात केली आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचा नारा देताना काही घोषणादेखील केल्या. तसेच ते म्हणाले, जागतिक स्तरावर आर्थिक क्षेत्रात जे काही चढ-उतार होत आहेत, मंदीसारखी आव्हाने आहेतच, या सगळ्यांचा आपल्या अर्थव्यवस्थेवर कमी परिणाम व्हावा यासाठी आपण काय करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आपण काय काय करू शकतो ते ठरवा, आपण नवीन क्षेत्रांमध्ये काय करू शकतो त्याबाबत विचार करून ठेवा. कारण पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी आपण या क्षेत्रासाठी नवे निर्णय घेणार आहोत, नव्या हालचाली करणार आहोत. मोदी यांनी एकप्रकारे आरबीआयला पुढील ५-१० वर्षासाठीच्या योजनांवर आणि धोरणांवर काम करण्यास सुचवले आहे. शपथविधीनंतर दुसऱ्या दिवशी त्यासंबंधीचे निर्णय घेतले जातील असे आश्वासनही त्यांनी आज दिले आहे.

## पंधरा एप्रिलपर्यंत न्या.कोठडीत..

संपल्याने ईडीने त्यांना आज राऊस व्हेन्यू कोर्टात हजर केले. कोर्टाबाहेर केजरीवाल मीडियाला म्हणाले, ते जे करत आहेत ते देशासाठी चांगले नाही. केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवालही न्यायालयात हजर होत्या. सुनावणी करत कोर्टाने केजरीवाल यांना १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

## सराईत गुन्हेगारांना वरला येथे अटक

कमलसिंह चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली वरला पोलिस ठाण्याचे निरीक्षक माधवसिंह ठाकूर, उपनिरीक्षक विकास बैनल, सहायक उपनिरीक्षक राजेश नय्यर, संजय पाटीदार, हवालदार गजेंद्र यादव, प्यारेसिंह चौहान, धर्मेंद्र वर्मा, आत्माराम निगोले यांनी ही कारवाई केली.

लोकेश वसंत जाधव (वय ४२, रा.लोहिया नगर, पुणे) व रमीझ नसीर सय्यद (वय २८, रा.घोरपडी, पुणे) यांचा संशयितांमध्ये समावेश आहे. दोघांवर पुणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळे गुन्हे दाखल असल्याची माहिती वरला पोलिसांनी दिली.

## पिडीत व्यक्तीस तात्काळ मदत

अनुक्रमे १५.५१ मिनिटे व १०.३५ मिनिटे होता. त्यामुळे एसपी धिवरे यांनी आढावा पिडीतास तात्काळ पोलीस मदत कशी पोहचेल याबाबत नियोजन करुन त्याची तंतोतंत अंमलबजावणी होणेकामी प्रभारी अधिकारी सपोनि विलास ताटीकोंडलवार यांना सुचना व मार्गदर्शन केल्याने माहे मार्च मध्ये पिडीतास पोलीस मदत पोचवण्याचा रिस्पॉन्स टाईम हा ३.५० मिनिट होवुन एवढ्या कमी वेळेत थेट पिडीतास तात्काळ मदत पोहचविणारा महाराष्ट्रातील तिसऱ्या क्रमांकाचा जिल्हा म्हणून नामांकन प्राप्त झालेले आहे. राज्यात प्रथम क्रमांकावर मीरा भाईंदर व व्दितीय क्रमांकावर मुंबई शहर यांना नामांकन मिळालेले आहे, धुळे जिल्हा पोलीस दल तिसऱ्या क्रमांकावर आल्याने पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सर्व डायल ११२ टिमचे अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक व अभिनंदन केलेले आहे.

सदरची कार्यवाही अधिक्षक धिवरे, अपर पोलीस अधी. काळे यांनी केलेल्या मार्गदर्शनाखाली डायल ११२ कार्यप्रणालीचे प्रभारी अधिकारी, सपोनि विलास ताटिकोंडलवार, मे.महिन्द्रा डिफेन्सचे अभियंता योगेश कापडे, तुषार सोनवणे, डिस्पॅचर पोहेकॉ वाघ, पोहेकॉ खलाणे, पोहेकॉ निकुंभे, मपोहेकॉ भोई, पोना बोरसे, मपोकॉ शेंडगे, मपोकॉ चौधरी व सर्व पोस्टेचे प्रतिसादक यांचे योगदान आहे.

## सहा तासात मुद्देमालासह अटक

त्यांनी जिल्हा पो.अधीक्षक श्रीकांत ढिवरे, अ.पो.अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय अधिकारी साजन सोनवणे यांचे मार्गदर्शनाने लागलीच तपास पथक नेमले. त्यात पो.उप.निरी विजय पाटील, पो.ह.कुणाल पानपाटील, मनोज तवर, पोकॉ. विशाल पाटील, कुणाल शिंगाणे, धिरज सांगळे, निलेश पाटील, राजु पावरा अशांना योग्य सुचना देवून तपासासाठी रवाना केले. सदर पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट देवून सी.सी.टी.व्ही फुटेज तपासून आर्वी गावाच्या परिसरात मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे पोलीस विभागाचे पारंपारीक व अत्याधुनिक तपास तंत्राचा पुरेपुर वापर करून सदर गुन्हा सहा तासाच्या आत उघडकीस आणला.

सदर गुन्ह्यात चोरीस गेलेली रोख रक्कम व सोन्याचे दागिने अशांसह गुन्ह्यातील मूळ सुत्रधार व मुख्य आरोपी मोहम्मद सोयब मोहम्मद सलिम (वय २६) रा.पवारवाडी, कुडते ईस्लाम मशिद जवळ मालेगाव व मोहम्मद रफिक मोहम्मद शराफत अली सिध्दीकी (वय १९) रा.अल्फा कंपनीच्या पाठीमागे पवारवाडी, मालेगाव जि.नाशिक या दोघांना तपास पथकाने मालेगाव येथे जावून अटक केली. गुन्ह्यातील रोख रक्कम व सोन्याचे दागिने आरोपींकडून जप्त करण्यात आले आहेत. या कामगिरीबद्दल वरिष्ठांनी तपास पथकाचे कौतूक केले आहे.

## दोघांची आत्महत्या

स्थितीत उपचारासाठी नातेवाईकांनी उपजिल्हा रूग्णालय चोपडा येथे दि.२७ मार्च रोजी आणले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी शिरपूर तालुका पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०